ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

वर्ष २५ | पुणें, बुधवार तारीख २८ जानेवारी, १९५९ | अंक ४

## विविध माहिती

**अमेरिकेची अफगाणिस्थानला मदत**—अफगाणिस्थानांत पडलेल्या अन्नधान्याच्या टंचाईच्या परिस्थितीस तोंड देणें शक्य व्हावें म्हणून अमेरिकेनें ५०,००० टन गहूं मदतीदाखल देण्याचें ठरविलें आहे. गव्हाची किंमत ४० लाख डॉलर्स होईल ह्याच रकमेंत वाहतुकीचा खर्च आलेला आहे. अफगाणिस्थान सरकारच्या विनंतीवरून मदत धाडण्यांत येत आहे.

**कम्युनिझमच्या धोक्याला तोंड देण्यासाठीं**—अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मि. डलेस सिनेटच्या परराष्ट्रीय संबंध समितीपुढें बोलतांना म्हणाले कीं, कम्युनिझमचा आर्थिक व लष्करी धोका सारखा वाढत आहे. ह्या धोक्याला यशस्वीपणें तोंड देण्यासाठी अमेरिकेच्या कित्येक पिढ्यांना त्याग आणि कमी प्रतीचा राहणीचा दर्जा स्वीकारावा लागण्याचा संभव आहे.

**देणगीकराची वसुली**—१९५८ सालीं देणगीकराची जी रकम डिसेंबरच्या सुरवातीपर्यंत वसूल झाली होती ती फारशी समाधानकारक नाहीं. अपेक्षित रकमेच्या मानानें एकषष्ठांश रकमच वसूल झाली. मार्च, १९५९ अखेर ३,००,००,००० रुपये गोळा होतील असा अंदाज होता. पण डिसेंबरच्या प्रारंभापर्यंत ३,२७० करपात्र लोकांची नोंद करण्यांत आली व ४६,६४,००० रुपये गोळा करण्यांत आले.

**पक्षांच्या गणनेसाठी विमानांचा उपयोग**— भारतांत स्थायिक झालेले प्रा. हाल्डेन ह्यांनीं अशी सूचना केली आहे कीं, भारतीय विमानदलाचा उपयोग करून पक्षांच्या थव्यांचीं चित्रें घेण्यांत यावीं. पक्षिगणनेसाठी अशा छायाचित्रांचा उपयोग होईल, असें त्यांचें म्हणणें आहे. जर्मनींतील पक्षिविषयक संशोधनाचा उल्लेख करून त्यांनीं अशी माहिती दिली कीं, ग्रहमाला यंत्रांत ठेवलेल्या प्रवासी पक्षांच्या वर्तनावरून त्यांना खऱ्या ग्रहमालेच्या रचनेचें उपजत ज्ञान असावें असें वाटतें.

**उसाच्या शेतकऱ्यांची मागणी**—उत्तर प्रदेशांतील ऊंस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या संघटनेनें साखर कारखान्यांना पुरविण्यांत येणाऱ्या उसाची किंमत वाढवून मिळावी अशी मागणी केलेली आहे सरकारला ही मागणी मान्य नाहीं. तरीपण, हा प्रश्न सलोख्यानें सोडविण्यासाठी कारखानदार, सरकार व शेतकरी ह्यांची एक त्रिपक्ष परिषद् भरविण्यांत येणार आहे.

**कच्च्या फिल्मचा कारखाना**—पूर्व जर्मन सरकारच्या साह्यानें भारतांत काढण्यांत यावयाच्या कच्च्या फिल्मच्या कारखान्यासंबंधीं उभय सरकारांत वाटाघाटी झाल्या आहेत. ह्या कारखान्यासाठी एकूण ४ कोटी रुपयांच्या परकीय चलनाची आवश्यकता आहे. त्यांपैकी सुमारें २·५ कोटी रुपयांचें परकीय चलन पूर्व जर्मनीचें सरकार देण्याची शक्यता आहे. कारखाना बहुधा उटकमंडजवळ काढण्यांत येईल.

**चीनमध्यें नव्या कालव्यांचें जाळें**—चीनमध्यें एकमेकांना जोडण्यांत येणाऱ्या अनेक कालव्यांचें जाळे पसरण्याचें काम सध्यां चालूं असून त्याकामीं ३·४ कोटी लोक सतत खपत आहेत. ह्या कालव्यांच्या योगानें पाणथळ भागांतील पाण्याचा निचरा होईल आणि अनावृष्टीचें भय कमी होईल. गहूं आणि कापूस पिकविणाऱ्या चीनच्या भागाला कालव्यांचा विशेष उपयोग होणार आहे.

**ग्रामसाह्यकांना शिक्षण**—उत्तर प्रदेश सरकारनें पुढील खरीप हंगामांत अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेस जोरानें चालना देण्याचें ठरविलें आहे. ह्या कामीं १० लाख ग्रामसाह्यकांना मुद्दाम शिक्षण देऊन तयार करण्यांत येणार आहे. उत्तर प्रदेशांतील शेतकऱ्यांपैकी ११ टक्के शेतकरी अशा रीतीनें तयार करण्यांत येणार आहेत. मागील हंगामांत अशा ग्राम साह्यकांचा सरकारला चांगला उपयोग झाला.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९१८ ] सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४ [ टेलिफोन २७०९४
भारतांतील सर्व केंद्रांतून व्यापारी लोकांच्या हुंड्या व रेल्वे रिसिटा यांची वसुली माफक दरानें केली जाते.
विशेष माहिती मुख्य कार्यालय किंवा कोणत्याहि शाखेंत मिळेल.
: शाखा :
फोर्ट, दादर, माहीम, वरळी, पुणें, बेळगांव ★ महिला शाखा : सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.

**पंजाबमध्यें अफूला बंदी**—पंजाब सरकारनें येत्या एप्रिलपासून राज्यांत अफूच्या विक्रीला बंदी करण्याचें ठरविलें आहे. ह्या निर्णयास अनुसरून ज्या अफूबाजांना अफूचे परवाने सध्यां दिलेले आहेत त्यांना पुन्हां नवे परवाने देण्यांत येणार नाहींत. सध्यां देण्यांत आलेली अफूच्या वाटपाचीं कार्डें मार्च महिनाअखेर आपोआप रद्द होतील.

**पाकिस्तानांतील आर्थिक जीवन**— पाकिस्तानमध्यें लष्करी हुकूमशाहीची स्थापना झाल्यापासून तेथील आर्थिक जीवन थंडावलें असल्याची वार्ता मुंबई उपनगर रोटरी क्लबांत श्री. एन् दांडेकर ह्यांनीं सांगितली. पाकिस्तानांतील व्यापारी व धंदेवाईक लोकांना आपले व्यवसाय पुन्हां चांगले चालू करण्यास बराच काळ जावा लागेल असा त्यांचा अंदाज आहे

**अमेरिकन भांडवल मिळण्याची शक्यता**—भारताचे अमेरिकेमधील माजी वकील श्री. गगनविहारी मेहता ह्यांनीं मद्रास येथें हिंदुस्थान चेंबर्सपुढें बोलतांना असें सांगितलें कीं, खाजगी मालकीचें अमेरिकन भांडवल भारतांत मोठ्या प्रमाणावर येण्याची फारशी शक्यता नाहीं. पण अमेरिकन द्रव्यविषयक संस्थांमार्फत भांडवल मिळविण्याचे प्रयत्न जरूर करण्यांत यावेत.

**केरळसाठी मदत मिळेल कां?**—केरळचे मुख्यप्रधान श्री. नंबुद्रीपाद रशिआला गेले आहेत. अलीकडे रशिआकडून भारताला अधिकाधिक आर्थिक मदत मिळत आहे. तिचा कांहीं भाग केरळसाठी वापरतां येईल काय, ह्याविषयीं ते रशिअन पंतप्रधान श्री. कुश्चॉव्ह ह्यांच्याशीं बोलणीं करणार आहेत.

**अंदमानांत तेलाचा शोध**—अंदमान व निकोबार ह्या बेटांत कांहीं ठिकाणीं दलदलीच्या उष्ण भूमींतून तेलमिश्रित पाण्याचा प्रवाह दिसून येतो. अशा भागांतून खनिज तेल सांपडूं शकेल काय हें पहाण्यासाठी भारताच्या नैसर्गिक वायू व तेल कमिशनतर्फें लवकरच भूगर्भीय तपासणी करण्यांत येणार आहे.

**दिवा-दासगांव रेल्वेमार्ग**— तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत दिवा तें दासगांव ह्या ९४ मैल लांबीच्या कोंकणांतील रेल्वेमार्गाचा समावेश करण्यांत येण्याची बरीच शक्यता आहे मार्गासंबंधीची प्राथमिक पहाणी १९५९-६० सालीं सुरू करण्यांत येईल. हा रेल्वे मार्ग झाल्यास पनवेल हें गांव मुंबईच्या उपनगरांत मोडूं लागेल.

**पंचगंगेवरील पूल**— कुरुंदवाडजवळ पंचगंगा नदीवर बांधण्यांत यावयाच्या पुलासंबंधीचें पहाणीचें काम पूर्ण झालें आहे. मुंबई सरकार बांधणार असलेल्या ह्या पुलासाठी ८ लाख रुपये खर्च येईल, असा अंदाज करण्यांत आला आहे. पूल १९६१ सालीं पुरा होईल, व त्यामुळें कुरुंदवाड व नरसोबाची वाडी ह्यांच्या दरम्यानची वहातूक सुलभ होईल.

**कमी प्रतीच्या कोळशाचा उपयोग**—काश्मीरच्या सरकारनें राज्यांतील कमी प्रतीचा कोळसा उपयोगांत आणण्यासाठी ७ कोटी रुपये खर्च येणारी योजना आंखली आहे. योजना दोन टप्प्यांत पुरी करण्यांत येणार आहे. पहिल्या टप्प्यांत १०,००० किलोवॅट वीज उत्पन्न करणारें केंद्र उभारण्यांत येणार आहे. दुसऱ्या टप्प्यांत गॅस व खतें उत्पन्न करण्यांत येतील.

**रस्त्यांच्या सुधारणेचा कार्यक्रम**—सुरत म्युनिसिपालिटीनें शहरांतील रस्ते डांबराचे करण्याचा कार्यक्रम आंखला आहे. हा कार्यक्रम तीन वर्षांत पुरा करण्यांत यावयाचा असून त्यासाठी १८ लाख रुपये खर्च येणार आहे. शहरांतील ६० रस्त्यांची अशी सुधारणा करण्यांत येणार आहे. त्यांची एकूण लांबी १८ मैल आहे.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८५,५०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री म. व्यं. शिगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

सुरक्षित गुंतवणूक तथापि भरपूर मोबदला

# दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

मुख्य कचेरी : रविवार पेठ, बेळगांव

मुंबई व म्हैसूर राज्यांत एकूण २१ शाखा

आमच्या ठेवीदारांसहि योग्य मोबदला मिळावा म्हणून आम्ही ठेवींवरील व्याजाचे दर खालीलप्रमाणें वाढविले आहेत.

★ द. द. शें. ४ टक्के व्याजाच्या त्रैवार्षिक कॅशसर्टिफिकेटसची नवीन योजना—

★ मुदत ठेवी—

| | | | |
|---|---|---|---|
| ६ महिने | द. द. शें. | ३ | टक्के |
| १ वर्ष | ,, | ३। | ,, |
| २ वर्षें | ,, | ३॥ | ,, |
| ३ वर्षें | ,, | ३॥। | ,, |
| ४ वर्षें | ,, | ४ | ,, |

★ सेव्हिंग्ज खातें द. द. शें. २ टक्के
होम सेव्हिंग्ज खातें ,, २॥ ,,

★ आकर्षक मोबदल्याची मासिक समान हप्त्यांची क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खातीं १, २, ३ व ४ वर्षांचे मुदतीनें स्वीकारलीं जातात.

—बँकेचें स्थैर्य व प्रगति दर्शविणारे आंकडे—

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. सहा लाख |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ,, सवातीन लाख |
| एकूण ठेवी | ,, एक कोटी, सदतीस लाख |

विशेष माहितीसाठी आमच्या कोणत्याहि शाखेंत चौकशी करा.

गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.
एच्. एस्. कुलकर्णी, बी. ए., जनरल मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. १८ जानेवारी, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अमेरिकन बँकांची कार्यपद्धति

### हिंदी बँकर्सची पाहणी : अनुकरणीय बाबी

सुमारें चार महिन्यांपूर्वी सोळा हिंदी बँकर्सची तुकडी अमेरिकेंतील औद्योगिक कर्जपुरवठ्याची पाहणी करण्यासाठी तेथें गेली होती. इंटरनॅशनल को-ऑपरेशन ॲडमिनिस्ट्रेशननें केलेल्या योजनेनुसार त्याची व्यवस्था झाली होती. ह्या बँकर्स-पैकी देना बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. प्रवीणचंद्र व्ही. गांधी, ह्यांनीं परत आल्यावर तेथील पहाणीची माहिती सांगितली. ती अतिशय उद्बोधक आहे.

प्रस्तुत पाहणीचा उद्देश अमेरिकेंतील बँकिंगच्या पद्धतींचा अभ्यास करणें, विशेषतः उद्योगधंद्यांना दिल्या जाणाऱ्या कर्जाचा तपशीलवार अभ्यास करणें, हा होता. कर्जदारांच्या पतीची छाननी, बँकांना मान्य होण्याजोगे कर्जदारांच्या व्यवहारांचे आंकडे व ताळेबंद, कर्जदाराविषयीं माहिती, बँकांनीं एकमेकांना पुरविण्याबाबत व्यवस्था, बँकेची मुख्य कचेरी व शाखा ह्यांचे-मधील कारभारविषयक व्यवस्था, दिलेल्या कर्जाच्या विनियोगा-विषयीं मधूनमधून करावयाच्या चौकशा, कर्जदारांना त्यांच्या धंद्याविषयीं तांत्रिक व आर्थिक सल्ला देण्याची व्यवस्था, इत्यादि बाबतींत हिंदी बँकर्सना खूपच पहावयास व शिकावयास मिळालें. त्यांना मालाच्या बाजारपेठा, स्टॉक एक्सचेंजेस, गुदामें, इत्यादींच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करतां आली आणि बँका दैनंदिन धोरणें कशीं आखतात व पार पाडतात, ह्याचाहि अनु-भव मिळाला.

धंदा मिळविण्यासाठी अमेरिकन बँका एकमेकांशीं खूपच स्पर्धा करीत असल्या, तरी त्यांचें एकमेकांशीं सहकार्यहि तितकेंच असतें, ही गोष्ट श्री. प्रवीणचंद्र गांधी ह्यांच्या विशेष नजरेंत भरली. कर्जमंजुरीपूर्वीं, बँका कर्ज मागणाराच्या आर्थिक परिस्थितीविषयीं इतर बँकांकडे चौकशी करतात व ती माहिती आपुलकीनें आणि विश्वासानें पुरविली जाते. कांहीं कर्जे देतांना बँका एकत्र येऊन कर्जपुरवठा करतात. ह्यामुळें, एकाच व्यक्तीला किंवा फर्मला अनेक बँकांकडून भरमसाट कर्जे काढतां येत नाहींत. हिंदी बँकांना ह्यापासून खूपच शिकतां येण्याजोगें आहे. मुंद्रा प्रकरणानें अशा सहकार्याची जरूर सिद्ध केलेली आहे. बँकांनीं असें सहकार्य केल्यानें गुप्तता राहणार नाहीं, असें सांग-ण्यांत येतें. दीड वर्षापूर्वीं, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. एच. व्ही. आर. अयंगार, ह्यांनीं अशा सहकार्याचें अगत्य प्रतिपादन केलें होतें. आतां भारतांतील सोळा प्रमुख बँकर्स बँका-बँकांतील सलोख्याचें व सहकार्याचें प्रात्यक्षिक पाहून आले असल्यानें, हिंदी बँकर्सचें मत बदलण्यास मदत होईल, अशी आशा आहे.

अमेरिकेंतील बँकांमधील ठेवींचा विमा उतरणाऱ्या फेडरल डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनच्या कामाची येथील बँकर्सना माहिती आहेच. अशा तऱ्हेच्या विम्यास येथें प्रारंभ करण्यांत यावा, अशी मागणी बराच काळ चालू आहे. सोळा प्रमुख हिंदी बँकर्सनीं अमेरिकेंतील डिपॉझिट इन्शुअरन्सचें काम अवलोकन केलें असल्यानें, ह्याहि बाबतींत त्यांनीं पुढाकार घ्यावा, अशीच अपेक्षा असणार.

अमेरिकेंत ओव्हरड्राफ्टची पद्धत श्री. गांधी ह्यांना आढळली नाहीं. प्रत्येक बँकेंत औद्योगिक तज्ज्ञ नेमलेले असतात; त्यांना प्रत्येक धंद्याची खडान्‌खडा माहिती असते. प्रत्यक्ष कारखान-दारांपेक्षाहि त्यांचें ज्ञान अधिक असतें. त्यामुळें, कर्जदाराच्या धंद्यास पुढें वाव कितपत आहे, ह्याचा सल्ला बँकेस मिळूं शकतो व त्यानुसार कर्जाबाबत योग्य तो निर्णय तिला घेता येतो.

एखाद्याला एखादा जिन्नस विकत घ्यावयाचा असेल, तर तो आपल्या बँकेला त्याप्रमाणें कळवितो. बँक दुकानदाराला पैसे देते आणि गिऱ्हाइकाला हवा तो जिन्नस घरपोंच मिळतो. बँक आपल्या गिऱ्हाइकाकडून हप्त्यांनीं रक्कम वसूल करतें. अशा रीतीनें, नागरिकांची सोय होते; त्यांच्या रहाणीचा दर्जा वाढतो; सबंध रक्कम शिल्लक पडेपर्यंत लोकांना खरेदी तहकूब ठेवावी लागत नाहीं. दुकानदाराच्या दुकानांतील माल हालून कारखानदाराचें उत्पादन वाढतें, बँकेला कर्जाची रक्कम व्याजासकट परत मिळते आणि गिऱ्हाइकाला हव्या त्या जिनसाचा उपभोग घेता येतो. अर्थात्, बँकेचें कर्ज वेळेवर फेडलें जाण्यावर ही साखळी अवलंबून राहते.

आपल्या येथील बँकांतून डायरेक्टर बोर्ड कर्जें मंजूर करतें. अमेरिकेंतील बँकांत, बोर्ड कर्जाची मर्यादा ठरवून देतें. तेथपर्यंत बँकेच्या कर्जखात्याचा अधिकारी कर्जें देऊं शकतो. पब्लिक लिमिटेड कंपन्यांना कर्ज देतेवेळीं त्यांच्या डायरेक्टरांच्या वैयक्तिक सह्या मागितल्या जात नाहींत; खाजगी लिमिटेड कंपन्यांचे बाबतींत मात्र अशा सह्या घेतल्या जातात.

---

## खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांचें स्थान

अमेरिकेमधील भारताचे माजी वकील आणि इंडस्ट्रिअल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. गगनविहारी मेहता ह्यांनीं सदर्न इंडिआ चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेपुढें बोलतांना, खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांच्या देशांतील अर्थव्यवस्थेच्या स्थानाबद्दल आपले विचार व्यक्त केले आहेत. आपल्या भाषणांत ते म्हणाले कीं, भारतांत भांडवलाचा संचय होण्याच्या मार्गांत कांहीं अडचणी आहेत ह्याविषयीं शंका नाहीं. पण म्हणून ह्या बाबतींत निराशावादी दृष्टिकोन स्वीकारणें योग्य होणार नाहीं. पहिली गोष्ट अशी कीं बऱ्याच उद्योगधंद्यांजवळ मोकळा पैसा असतो. त्याशिवाय त्यांना होणाऱ्या नफ्यांतूनहि भांडवलाची गुंतवणूक करतां येण्यासारखी आहे. ह्या गोष्टी जर ध्यानांत घेतल्या तर पुरेसें भांडवल जमण्यास अडचण पडण्याचें कारण राहणार नाहीं. गेल्या नऊ-दहा वर्षांत सरकारनें उद्योग-धंद्यांना द्रव्यविषयक मदत करण्यासाठी संस्था स्थापन केल्या आहेत. आतांपर्यंत एकट्या इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशननेंच

सुमारें ५५ कोटी रुपयांचें साह्य उद्योगधंद्यांना दिलेलें आहे. प्रत्येक राज्याची स्वतंत्र अशी फायनॅन्स कॉर्पोरेशन्स आहेतच. त्याशिवाय सरकारतर्फे छोट्या उद्योगधंद्यांना खास आर्थिक मदत दिली जात आहे.

आजच्या परिस्थितींत उद्योगधंद्यांची स्थापना व वाढ हा प्रश्न केवळ द्रव्यविषयक राहिलेला नाहीं. उद्योगधंद्यांच्या भरभराटीचा प्रश्न हल्लीं तांत्रिक प्रगतीशीं आणि शास्त्रीय व तांत्रिक ज्ञानाशीं निगडित झालेला आहे. पाश्चिमात्य देशांकडे नजर टाकली तर असें दिसून येईल कीं त्या देशांतून उद्योगधंद्यांतील पुढारीपणा मांडवलदारांकडे राहिलेला नाहीं. आज हा पुढारीपणाचा मान तंत्रकुशल माणसांकडे गेलेला दिसतो. आजच्या जगांत तांत्रिक विकास फार झपाट्यानें होत आहे. ह्या विकासाच्या आघाडीवर राहूं शकतील अशा प्रकारच्या तंत्रकुशलांचें हें युग आहे. भारताच्या सर्व भागांची औद्योगिक उन्नति साधण्यास मदत करावी ह्या हेतूनें कॉर्पोरेशनची स्थापना करण्यांत आली आहे. देशाचे सर्व भाग औद्योगिकदृष्ट्या प्रगत झाले म्हणजे सर्वच अर्थव्यवस्था समप्रमाणांत वाढीस लागेल म्हणून व्यापारी व उद्योगपती ह्यांनीं अडचणी येत असल्या तरी त्यांना आशेनें व आत्मविश्वासानें तोंड देण्यास शिकलें पाहिजे. अडचणी, कमकुवतपणा आणि अपयश ह्यांना दाद न देतां देशाच्या उद्योगधंद्यांची उभारणी त्यांना करावयाची आहे. तेव्हां अडचणी ह्या एका अर्थानें संधीच आहेत हें त्यांनीं लक्षांत घ्यावें. अमेरिकेंतील लोक भारतामधील लोकांप्रमाणें सरकारी मदतीवर फारसें अवलंबून रहात नाहींत. अमेरिकेच्या आर्थिक ताकदीचा एक महत्त्वाचा उगम तेथील स्वेच्छेच्या संघटनांत दिसून येतो. ह्या संघटना लोकमताला वळण लावण्यांत व तें प्रभावी करण्याच्या कामीं महत्त्वाचें कार्य करतात. त्यांच्यामुळें सरकारच्या धोरणावरहि अनेक प्रकारांनीं परिणाम घडून येतो. पण आज हिंदुस्थानांत मात्र सरकारी मदतीच्या अभावीं कांहींच न करावयाचें उदासीनतेचें वातावरण अनुभवास येतें. चेंबर्स ऑफ कॉमर्स सारख्या संघटनांनीं जर आत्मविश्वासपूर्वक आणि निर्भयतेनें आपले विचार व्यक्त केले तर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. एका अर्थानें पाहिलें तर असें दिसतें कीं भारतांत अद्याप विचारांचा काटेकोरपणा दिसून येत नाहीं. खाजगी मालकीच्या विभागानें सरकारवर टीका करण्यापूर्वी आपलें घर स्वच्छ करावें. प्रथम आपलें वर्तन टीकास्पद नाहीं अशी खात्री त्यांनीं करवून घ्यावी.

---

## पाकिस्तानी लष्करी राजवटीपासून निष्पत्ति

पाकिस्तानच्या इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांपासून दडवलेली १३४·४ कोटी रुपयांची मिळकत १५ जानेवारी, १९५९ अखेर बाहेर आली आहे. त्यावर कराच्या रूपानें पाकिस्तान सरकारला ३२ कोटी रुपये मिळूं शकतील. परदेशांतील ८·१ कोटी रुपयांच्या लपवलेल्या शिलका उजेडांत आल्या आहेत. दडवलेल्या उत्पन्नाच्या ८५,००० प्रकरणांपैकी २२,००० नवे करपात्र लोक आहेत. पाकिस्तानी रुपयाची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारांत १ डॉलर = ६·७ रु. अशी होती, ती आतां बरीच सुधारून १ डॉलर = ५·५ रु. अशी झाली आहे. लवकरच ती ठरलेल्या पातळीवर येईल, अशी आशा व्यक्त करण्यांत येत आहे.

---

## दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

### १९५८ चा नफा

दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. ला ३१ डिसेंबर, १९५८ अखेर संपलेल्या वर्षी, गेल्या वर्षातील रु. १८,४४,०४६=०५ नफा धरून, निव्वळ रु. १,१९,८६,११०=२९ नफा झाला. त्यांतून खालीलप्रमाणें वांटणी करण्यांत आलेली आहे:—

| | |
|---|---|
| ३० जून, १९५८ अखेर संपलेल्या सहामाहीसाठी ॲड–इंटेरिम डिव्हिडंड १२% करमाफ, म्हणजे प्रत्येक भागास रु. १=५०, १२,५८,१७० भागांवर | रु. १८,८७,२५५=०० |
| करासाठी तरतूद | रु. १६,५०,०००=०० |
| स्टाफ ग्रॅच्युइटीकडे वर्ग | रु. १०,००,०००=०० |
| स्टाफ बोनसची तरतूद | रु. ३२,००,०००=०० |
| | रु. ७७,३७,२५५=०० |
| उरलेल्या रु. ४२,४८,८५५=२९ चा विनियोग खालीलप्रमाणें करावा, अशी डायरेक्टरांची भागदारांना शिफारस आहे:—३१ डिसेंबर, १९५८ अखेरच्या सहामाहीसाठी फायनल डिव्हिडंड १६% करमाफ, म्हणजे प्रत्येक भागास रु. २, १२,५८,१७० भागांवर (म्हणजे, सबंध वर्षाचें १४% डिव्हिडंड होते) | रु. २५,१६,३४०=०० |
| पुढील वर्षात ओढावयाचा शिलकी नफा | रु. १७,३२,५१५=२९ |
| | रु. १,१९,८६,११०=१० |

---

## भारताच्या विकासयोजनांची जपानतर्फे पाहणी

भारताच्या विकासयोजनांना साह्य करण्यासाठी गेल्या वर्षी जपाननें मोठें कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून घेण्यासाठी ज्या योजना मुक्रर करण्यांत आल्या आहेत त्यांचा अभ्यास करण्यासाठी जपानच्या एक्सपोर्ट–इंपोर्ट बँकेचे अध्यक्ष भारतांत आले आहेत. जपानकडून भारताला मिळावयाच्या कर्जाची रक्कम तीन वर्षांच्या काळांत हप्त्यानें मिळणार आहे. ३१ मार्च १९५९ रोजीं संपणाऱ्या आर्थिक वर्षांत जपानकडून ६६ कोटी रु. घेण्याचें ठरलें आहे. कर्ज येनच्या चलनांत देण्यांत येणार असून त्याचा उपयोग जपानमध्यें जरूर ती यंत्रसामुग्री घेण्याकडेच करावयाचा आहे. रेल्वेसाठी लागणारी यंत्रसामुग्री, कोळशावर व पाण्यावर वीज उत्पन्न करण्यासाठीं लागणारीं यंत्रें, वीजवाहक तारा व धरणबांधणीचें साहित्य, कोळशाच्या व इतर खनिजांच्या खाणींतून वापरण्यांत येणारीं यंत्रें, बोटी, इत्यादि माल भारतानें जपानकडून घ्यावयाचा आहे. ओरिसामधील लोखंडाच्या खाणींतील माती जपानला पुरवावयाचा करार झालेला आहे. ह्या कराराप्रमाणें दरसाल २० लाख टन लोखंडाची माती जपानच्या पोलादाच्या कारखान्यांना निर्यात करण्यांत येणार आहे. ओरिसामधील लोखंडाच्या खाणी चालू करण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री जपान पुरविणार आहे. खाणी १९६४ च्या सुमारास चालू होतील असा अंदाज आहे. ह्याच कारणासाठी अमेरिकेकडूनहि २·२ कोटी डॉलर्सची मदत मिळणार आहे. त्याशिवाय दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील परदेशीय चलनाची टंचाई अंशतः भागविण्याच्या उद्देशानें जपान जागतिक बँकेच्यामार्फत आणखी १ कोटी डॉलर्स देणार आहे.

## नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें विकण्याचें तंत्र

### श्रीमती लीला करंदीकर ह्यांची कार्यपद्धति

[ वैधव्याच्या आपत्तीनें गांगरून न जातां, स्वावलंबी जीवनासाठी नवा मार्ग शोधून यशस्वी होत असलेल्या एका उद्यमशील महिलेच्या कर्तृत्वाचा परिचय श्री. वा. काळे ह्यांनीं स्वराज्य कामधंदा विशेषांकांत करून दिला आहे. दैवी आघाताला आत्मविश्वासानें तोंड देणारी महिला, श्रीमती लीला करंदीकर, ह्यांच्या कामगिरीचा तो वृत्तांत आहे. नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें विकण्याच्या त्यांच्या हातोटीचें वर्णन त्या लेखांतून येथें उद्धृत केलें आहे. ]

दूधकेंद्रावरील या कारकुनी करणाऱ्या बाईची कर्तबगारी अशी कीं तेथील ओळखींतून त्या विम्याचें व सर्टिफिकिटाचें काम मिळवूं लागल्या. दूधकेंद्रांत त्यांच्या गिऱ्हाइकांचे पत्ते असतातच, तेथें साबण खपविण्याचे निमित्तानें प्रथम जाऊन हळूहळू त्याहिपेक्षा अधिक फलदायी व्यवसायाचें सूतउवाच त्या करूं लागल्या. कांहीं लोकांच्याकडे नमुन्यादाखल दूध पाठवून त्यांना दूधकेंद्राचें गिऱ्हाईक केल्यानें केंद्राच्या संचालिकाहि खुष होतात आणि लीलाताईंनाहि नवीं नवीं गिऱ्हाइकें मिळतात. दूध केंद्रावरील कारकुनी आणि साबण वाटण्याच्या फेऱ्या, यांतून लीलाताईच्या प्रमुख व्यवसायाचा, म्हणजे नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांच्या विक्रीचा पाया निर्माण झालेला आहे.

### यशाचें रहस्य कशांत आहे ?

पुण्यांत १९५७ सालीं नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटांचें काम करणाऱ्या सुमारें २२५ स्त्री–पुरुषांमध्यें पहिल्या पांचांत तिसरा श्री. लीला करंदीकर यांचा अनुक्रम आहे. त्यांनीं आजवर सुमारें १६ लक्ष रुपयांचें काम पुरें केलें आहे. त्यांच्या यशाचें रहस्य समजून घेणें बोधप्रद होईल. दिसायला क्षुल्लक गोष्टी किती उपयुक्त व फलदायी ठरतात, हें त्यावरून दिसून येईल.

त्यांचीं कांहीं वैशिष्ट्यें आतां सांगतों. त्यांच्या घरावर त्यांचें व त्यांच्या व्यवसायाचें स्वरूप दर्शविणारी ठळक पाटी आहे. त्यामुळें कुणालाहि त्यांचें घर सांपडणें सोपें जातें. पाटी वाचून सर्टिफिकेट घेणारे लोक बरेच आहेत. पाटी नसती, तर त्यांचें काम लीलाताईंना मिळालें नसतें.

नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें गिऱ्हाइकाला देतांना, त्या एका उत्कृष्ट पाकिटांत घालून देतात. हें पाकीट जसेच्या तसें कुलपांत ठेवतां येतें. पाकिटावर लीलाताईंचें नांव व पत्ता आहेच. आणखी सर्टिफिकिटें हवीं असलीं, कीं त्यांना बोलावणें पाठवण्याचा अवकाश; त्या ताबडतोब हजर !

आपल्या गिऱ्हाइकांना त्या तिकीट लावलेलें व पत्ता लिहिलेले कार्ड देतात. या कार्डांचा उपयोग गिऱ्हाइकानें करावयाचा व लीलाताईंना वळ व तपशील कळवावयाचा. अशा कार्डांचा खूपच उपयोग होतो, असा त्यांचा अनुभव आहे.

वेळेवर जाण्याचें बंधन त्या कटाक्षानें पाळतात. ठरलेल्या वेळीं हजर झाल्यानें कामें सत्वर उरकतात आणि गिऱ्हाइकांवर छापहि चांगली पडते.

कुणालाहि भेटायला जातांना त्या आपलें व्हिजिटिंग कार्ड घेऊन जातात. हें कार्ड अतिशय सुबक छापलेलें आहे. त्यामुळें कचेरींतील अधिकाऱ्यांची भेट सुलभतेनें होऊं शकते.

पुष्कळ लोक दरमहा ठराविक रकमेचीं सर्टिफिकिटें घेणारे असतात. त्यांचा फॉर्म भरून आणण्यासाठी एक खेप, सर्टिफिकिटें देण्यासाठी दुसरी खेप, अशा किमान दोन खेपा तरी घालाव्या लागतात. खेपांचें सरासरी प्रमाण तीन हें पडेल. लीलाताई पुढील महिन्याचे अर्ज आधींच घेऊन ठेवतात, १ तारखेला स्वतःच्या पैशांतून सर्टिफिकिटें खरेदी करतात आणि गिऱ्हाइकाकडून पैसे घेऊन त्याच्या हवालीं तीं करतात. अशा रीतीनें वेळेची कितीतरी बचत होते. गिऱ्हाईक खुष होते व गिऱ्हाइकी वाढते. सुमारें २ ते ३ हजार रुपये अशा रीतीनें त्यांनीं गुंतविलेले असतात. अर्थात् त्यांत दररोज उलाढाल होत असते.

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व दुसऱ्या आठवड्यांत जुन्या गिऱ्हाइकांचीं सर्टिफिकिटें देणें हें काम करावयाचें आणि दुसऱ्या पंधरवड्यांत नव्या ओळखी करून गिऱ्हाइकें तयार करावयाचीं असा त्यांचा क्रम आहे.

गिऱ्हाइकांचा चेक प्रत्यक्ष वटल्याखेरीज त्या सर्टिफिकेट त्याला देत नाहींत. त्यामुळें पुष्कळच त्रास वांचतो. केवळ पुण्यांतच नव्हे, तर पुण्याहून मुंबईलाहि ठराविक तारखांना जाऊन त्या सर्टिफिकिटांचें काम करतात.

सर्टिफिकिटांच्या अर्जावर त्यांच्या एजन्सीच्या नांवाचा रबरी शिक्का उठवलेला असतो. त्यामुळें पोस्टांत काम सोपें होतें.

पोस्टाच्या शेजारच्याच एका बँकेंत त्यांनीं आपलें खातें ठेवलें आहे. त्यामुळें येण्या–जाण्यांत वेळ जात नाहीं.

गिऱ्हाईक कितीहि लहान असो किंवा मोठें असो, तितक्याच आपुलकीनें आणि कार्यक्षमतेनें त्या त्याच्याकडे लक्ष पुरवितात.

लीलाताईंचा कुठलाच हेलपाटा वाया जात नाहीं. कारण अगदीं कांहीं नाहीं तरी साबण तर खपतोच. साबणाच्या निमित्तानें पुनः गेल्यावर कांहीं तरी काम निघतेंच !

मोलकरणीपासून लक्षाधीशापर्यंत त्यांचे ग्राहक आहेत. त्या सर्वांना बचत करायला शिकवून आणि ती बचत सरकारला मिळवून देऊन लीलाताई राष्ट्रसेवाच करीत आहेत. २० डिसेंबर, १९५८ रोजीं रेडिओ पुणें केंद्रावरून त्यांचे अल्पबचत योजनेवर भाषण झालें. त्यांत त्यांनीं अल्पबचतीच्या छंदाचें मार्मिक विवेचन केलें. व्यवसायांत पडणाऱ्या स्त्रियांनाच नव्हे, तर पुरुषांनाहि लीलाताईपासून खूपच शिकण्याजोगे आहे. परप्रांतांतील आपल्या वास्तव्याचा त्यांनीं कसा फायदा करून घेतला आहे हेंहि मोठें उद्बोधक आहे. घरोघरीं जाऊन विक्री करणाऱ्या व्यक्ति लीलाताईंच्या इतक्या कुशल व व्यवहाराशीं एकरूप झालेल्या असतील, तर दारावरील घंटा वाजवून हातांत बॅग घेऊन प्रवेश करणाऱ्या विक्रेत्यांची अवहेलना होणार नाहीं; त्यांचें स्वागतच होईल. लीलाताईंनीं आपल्या व्यवसायाचा दर्जा वाढवून त्याला व स्वतःला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे.

---

### सैनिकांसाठी खाऊ

प्रजासत्ताक दिनाची भेट म्हणून भारताच्या इंडोचायना व इजिप्त येथील सैनिकांना खाऊ पाठविण्यांत आला आहे. श्रीमती इंदिरा गांधी ह्यांनीं ह्या खाऊच्या खरेदीची व्यवस्था केली आहे. सुमारें २० मण वजनाच्या खाऊच्या पेट्या सैगांव व कैरो येथें पोचविण्यासाठी एअर–इंडिया इंटरनॅशनलच्या स्वाधीन करण्यांत आल्या आहेत.

## कोकोचा चलनासाठीं उपयोग

मानवी इतिहासांत जेव्हांपासून व्यापार सुरू झाला तेव्हांपासून वस्तूंची विक्री अगर देवाण-घेवाण करण्यासाठीं कोणत्या तरी प्रकारच्या चलनाची जरूरी भासूं लागली. चलन अगर पैसा म्हणून अनेक प्रकारच्या वस्तू वापरण्यांत येत असत, हें अर्थशास्त्राच्या इतिहासज्ञांना माहीत आहे. ब्रिटिश राजवट भारतांत स्थिर झाल्यावरसुद्धां भाजीबाजारांत कवड्या चलनासारख्या वापरीत असत. चलन म्हणून वापरण्यांत येणाऱ्या वस्तूंत कोकोच्या बियांचाहि समावेश आहे. बँक ऑफ मेक्सिकोनें आपल्या मासिक आर्थिक अहवालांत ह्यासंबंधीं माहिती दिली आहे. मेक्सिकोमधील ॲझटेक ह्या प्राचीन संस्कृतींत कोकोचा चलन म्हणून उपयोग करण्यांत येत असे. कोकोचें उत्पादन मूळ मेक्सिकोमध्यें व मध्य अमेरिकेंत होत असे. ॲझटेक संस्कृतीच्या विकासाला कोकोच्या व्यापारानें चांगली मदत केली होती. मेक्सिको स्पेनच्या अंमलाखालीं जाईपर्यंत कोकोचा पैशासारखा उपयोग केला जात असे. पण स्पेनचा अंमल सुरू झाल्यावर १७ व्या शतकापासून कोकोच्या लागवडीकडे दुर्लक्ष करण्यांत येऊं लागलें आणि खुद्द मेक्सिकोलाच कोकोची आयात करावी लागली. ह्या परिस्थितीकडे सरकारचें लक्ष वेधण्यांत आलें. तेव्हां कोकोच्या लागवडीला उत्तेजन देण्यांत आलें. १९४७ सालीं ६,३५० टन कोकोचें उत्पादन झालें होतें; तें १९५७ सालीं १४,९४९ टन झालें. १९५७ च्या उत्पादनापैकीं ६,७४१ टन कोको निर्यात करण्यांत आला. मेक्सिकोमध्यें कोकोच्या उत्पादनाची वाढ करण्यास अनकूल परिस्थिति आहे. कोकोच्या लागवडीला व उत्पादनाला आणखी उत्तेजन देण्यांत आलें तर कोकोच्या निर्यातींत मेक्सिको महत्त्वाचें स्थान मिळवील असा विश्वास व्यक्त करण्यांत आला आहे.

---

## इंडियन मर्चंट्स चेंबरचे नवे अध्यक्ष
## श्री. लालचंद रतनचंद

श्री. लालचंद रतनचंद ह्यांची इंडियन मर्चंट्स चेंबरच्या अध्यक्षपदीं १९५९ सालाकरितां एकमतानें निवडणूक झाली आहे. सुप्रसिद्ध वालचंद हिराचंद उद्योगसमूहापैकीं श्री. रतनचंद हे आहेत. प्रीमिअर ऑटोमोबाइल्स लि., इंडियन ह्यूम पाइप कं. लि., कूपर इंजिनिअरिंग कं. लि., बॉबे सायकल अँड मोटर एजन्सी लि., इत्यादि कंपन्यांचे ते चेअरमन असून प्रीमिअर कन्स्ट्रक्शन कं. लि., हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कं. लि., वालचंद-नगर इंडस्ट्रीज लि., सिंधिया स्टीम नॅव्हिगेशन कं. लि., इत्यादि कंपन्यांचे ते डायरेक्टर आहेत.

---

## ३५० अमेरिकन प्रवासी येणार

११ फेब्रुवारी, १९५९ रोजीं एका १८,७५० टनी नॉर्वेजिअन आगबोटीनें ३५० अमेरिकन प्रवासी मुंबईस येणार आहेत. आगबोट मुंबई बंदरांत एक आठवडा थांबेल, आणि प्रवासी त्या मुदतींत भारतांतील ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळें पाहून येतील.

---

## सार्वत्रिक निवडणुकीचा खर्च

पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळीं एकूण १०.५ कोटी रु. खर्च आला. दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळीं तो ५.९ कोटी रुपये आला.

## दि म्हैसूर किर्लोस्कर लि.

वरील कंपनीनें प्रत्येकीं १०० रुपयांचे १५,००० भाग विक्रीस काढले आहेत. २५ रु. अर्जाबरोबर, २५ रु. अर्जमंजुरी-नंतर आणि उरलेले ५० रु. मागणी केल्यानंतर भरावयाचे आहेत. विद्यमान भागदारांना हे नवे भाग मिळण्याचा अग्रहक्क राहील. त्यांच्या प्रत्येक पांच भागांमागें नवे तीन भाग त्यांना मागतां येतील. मेसर्स आर. आर. नाबर आणि कंपनीनें विक्रीस काढलेले भाग अंडररार्इट केलेले आहेत. तेव्हां, विद्यमान भागदारांनीं न घेतां उरलेले सर्व भाग नाबर कंपनीला किंवा तिनें आणलेल्या गिऱ्हाइकांना दिले जातील. आयर्न फाऊंडर्स, मेकॅनिकल इंजिनिअर्स, मशीन टूल्सचे उत्पादक, असें कंपनीच्या धंद्याचें वर्णन करतां येईल. ३० जून, १९५८ अखेर संपलेल्या वर्षाकरितां संकल्पित डिव्हिडंड करमाफ ७½% आहे. त्यापूर्वी तीन वर्षे तें करमाफ ६% होतें.

---

## परराष्ट्रीय व्यापारांतील प्रतिकूल तफावत

आयातीमध्यें मोठी घट आणि निर्गतीमध्येंहि कांहीं घट, ह्यामुळें भारताच्या परराष्ट्रीय देण्या-घेण्याच्या हिशेबांत १९५७ च्या मानानें १९५८ मध्यें कमी तूट आली आहे. १९५७ च्या पहिल्या ११ महिन्यांत प्रतिकूल तफावत ३११ कोटी रु. होती. ती १९५८ च्या पहिल्या ११ महिन्यांत १७६ कोटी रु. भरली. भारतानें २०३ कोटी रु. ची आयात कमी केली, त्याचा मुख्यत: हा परिणाम आहे. प्रतिकूल तफावत कमी होऊन केवळ भागणार नाहीं. अनुकूल वाढावा उरायला लागेल तेव्हांच आपण परराष्ट्रीय देणीं फेडूं शकूं.

---

## इराणकडे २५ रेडे रवाना

यु. स्टे. टेक्निकल को-ऑपरेशन मिशननें मुंबईच्या आरे मिल्क कॉलनींतून ३५,००० रुपयांना २५ रेडे विकत घेऊन ते इराणच्या सरकारला देणगी म्हणून पाठविले आहेत. गेल्या शनिवारीं ते बोटीवर चढविण्यांत आले. एक इराणी अधिकारी रेड्यांबरोबर प्रवास करीत आहे.

---

## १९६१ च्या शिरगणतीची पूर्वतयारी

१९६१ सालीं शिरगणति होणार आहे. त्यावेळीं लोकांना विचारण्यांत येणाऱ्या प्रश्नांची व मिळणाऱ्या उत्तरांची चांचणी करण्याचें काम चालूं झालें आहे. प्रश्नपत्रिका सर्व राज्य सरकारांकडे पाठविण्यांत आल्या असून त्या राज्यांनीं खेडेगांवीं व शहरी जनतेंत त्यांची चांचणी घ्यावयाची आहे. येणारा अनुभव जमेस धरून प्रश्नपत्रिका पक्की केली जाईल.

---

## "कॉफीची लागवड वाढवूं नका"

कॉफीच्या जागतिक खपापेक्षां जागतिक उत्पादन अधिक गतीनें वाढत आहे. सहा ते नऊ महिन्यांच्या मागणी इतका कॉफीचा सांठा आज पडून आहे. भारताची कॉफी टिकाव धरून रहावयाची असेल, तर तिचा उत्पादन खर्च कमी झाला पाहिजे, दर्जा सुधारला पाहिजे आणि दर एकरीं उत्पादन वाढलें पाहिजे. कॉफीची लागवड वाढविण्याचे प्रयत्न मुंबई प्रभृति राज्यें करीत आहेत, त्याबद्दल हिंदी कॉफी बोर्डाचे चेअरमन, श्री. श्रीनिवासन, ह्यांनीं नापसंती व्यक्त केली आहे.

## सरकारी क्षेत्रांतील कोळशाचें उत्पादन

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ६० दशलक्ष टन कोळसा उत्पादनाचें लक्ष्य ठरविण्यांत आलें होतें. म्हणजे हा आंकडा पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस झालेल्या दरवर्षी ३८ दशलक्ष टन उत्पादनापेक्षा २२ दशलक्ष टनांनीं जास्त आहे. या संकल्पित जादा वार्षिक उत्पादनापैकी सरकारी क्षेत्राकडून प्रतिवर्षी १२ दशलक्ष टन जादा कोळशाचें उत्पादन अपेक्षित होतें. यांपैकी १·५ दशलक्ष टन कोळशाचें उत्पादन आंध्र प्रदेश राज्यांतील सिंगेरेनि कोळसा खाणीकडून तर उरलेलें उत्पादन अकरा खाणी ताब्यांत असलेल्या मध्यवर्ती सरकारनें करावयाचें होतें. हें उद्दिष्ट गांठण्यासाठी अनेक नवीन कोळसा खाणी सुरू करावयाच्या होत्या तर जुन्या कोळसा खाणींच्या उत्पादनांत वाढ करावयाची होती. याकरितां ऑक्टोबर १९५६ मध्यें दि नॅशनल कोल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ( प्रायव्हेट ) लि. ची स्थापना करण्यांत आली या कॉर्पोरेशनची मुख्य कचेरी रांची येथें आहे.

बिहार, मध्यप्रदेश व ओरिसा राज्यांतील नव्या कोळसा खाणींतून अनुक्रमें ६·५, ३·१, व ·५ दशलक्ष टन मिळून १०·१ दशलक्ष टन व जुन्या खाणींचें उत्पादन ०·५ दशलक्ष टनांनीं वाढवून एकूण १०·६ दशलक्ष टन उत्पादन वाढविण्याचें ठरलें आहे.

### जुन्या कोळसा-खाणी

बिहार, ओरिसा व मध्यप्रदेश राज्यांत मिळून ११ जुन्या कोळसा खाणी आहेत. या खाणींत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीला दरवर्षी ३० दशलक्ष टन कोळशाचें उत्पादन झालें असून १९६०-६१ पर्यंत त्यांत ३·५ दशलक्ष टनांपर्यंत वाढ करण्याचें ठरलें आहे. या खाणींतून १९५५-५६ मध्यें २९, १५, ६७९ टन उत्पादन झालें होतें. हा आंकडा १९५७-५८ मध्यें ३३, ५६, ६९१ टनांवर गेला.

उपरोक्त कॉर्पोरेशननें नवीन खाणींत उत्पादनास सुरुवात करण्यासाठी प्राथमिक स्वरूपाचे अनेक उपाय योजिले आहेत.

इंडिअन ब्यूरो ऑफ माइन्स आणि जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिआ या खात्यांनीं १९५५ व १९५६ मध्यें 'ड्रिलिंग'च्या कामास सुरुवात केली. ३० जून १९५८ पर्यंत ५,०४,३८५ फूट काम झालें. कोरवा, कथारा, जिडी, सौंडा, सायल, विश्रामपूरचा कांहीं भाग व कोरिआ या विभागांत कमीअधिक प्रमाणांत शोध घेण्याचें व 'ड्रिलिंग'चें काम पुरें झालें पाहिजे.

दी कोल बेअरिंग एरिआज् ( ॲक्विझिशन अँड डेव्हलपमेंट ) ॲक्ट, १९५७ अन्वयें सदर कॉर्पोरेशननें डिसेंबर १९५७ पासून पुढें जरूर ते विभाग ताब्यांत घेण्याच्या कामास प्रारंभ केला.

नव्या कोळसा खाणींसाठी लागणाऱ्या खाणकामविषयक यंत्रसामुग्रीपैकी ५० टक्के सामुग्रीच्या मागण्या नोंदविलेल्या असून त्यापैकी बरीच सामुग्री आली व निरनिराळ्या खाणींमधून प्रत्यक्ष उपयोगांत येऊं लागली आहे.

खाण विभागांच्या दुर्गमतेमुळें त्या भागांत रेल्वे फाट्यांची तरतूद करणें भाग होतें. चम्पा आणि कोरवा या दरम्यानचा २५ मैलांचा रेल्वेमार्ग याआधींच पुरा झाला आहे. प्रत्यक्ष कामास प्रारंभ झालेली दुसरी योजना म्हटली म्हणजे मध्य प्रदेशांतील विजुरी आणि कारोजी यांमधील साठ मैलांचा रेल्वेमार्ग बांधणीची होय. कोळसा खाणी विभागांसाठी पत्रातु-दामोदर रेल्वे फाट्याचा विस्तार वाढविण्याची आणखी एक महत्त्वाची योजना आहे. या फाट्यावर दामोदर नदीवर पूलहि बांधावा लागेल. कथारा, बचरा आणि सौंडा या खाणी विभागांसाठीं बांधलेल्या रेल्वे साइडिंगचा आतां उपयोगहि होऊं लागला आहे. कोरवा विभागांत हासदेव नदीवर पूल बांधणीबाबतची आणखी एक महत्त्वाची योजना आहे.

या कॉर्पोरेशननें कनिष्ठ श्रेणींतील नोकरवर्गासाठी होणारी मागणी पुरी करण्यासाठी गिरीडी, कारजेली, कुरासिया आणि तालकोट या ठिकाणीं शिक्षण देण्याकरतां शाळा सुरू केल्या आहेत.

### खाजगी क्षेत्रांतील कोळसा-उत्पादन

खाजगी क्षेत्रांत, राणीगंज, झारिया, करंजपुरा व सी. आय. सी. ( रेवा व कोरिआ ) या खाणींनीं मिळून १ कोटी टन कोळशाचें उत्पादन काढावें असें लक्ष्य सरकारनें ठरवून दिलें आहे. १९५८ मध्यें या निरनिराळ्या खाणींतून ४२·२० दशलक्ष टन कोळशाचें उत्पादन झालें असावें असा अंदाज आहे.

निरनिराळ्या कोळसा खाणींतून १९५० मध्यें झालेलें कोळसा उत्पादन व रवानगी अनुक्रमें ३२·२९५ दशलक्ष टन व २७·११५ दशलक्ष टन असें होतें. १९५६ मधील हेच आंकडे अनुक्रमें ३९·४३१ दशलक्ष टन व ३७·९५७ दशलक्ष टन असें होतें. तर १९५७ मध्यें तें अनुक्रमें ४३·५०४ दशलक्ष टन व ३७·६८६ दशलक्ष टन होतें. १९५८ च्या जुलैपर्यंतचें हेच आंकडे अनुक्रमें २६·३६७ दशलक्ष टन व २३·०३८ दशलक्ष टन असे होते.

---

### मृत्यू कमी झाले, पण जननांत घट नाहीं

भारतांतील मृत्यूंचें प्रमाण खूपच उतरलें आहे, पण जननाचें भारी प्रमाण उतरण्याचीं अद्याप चिन्हें नाहींत" असें युनायटेड नेशन्सच्या अहवालांत म्हटलें आहे


नवीन वर्षांत वैयक्तिक अर्थनियोजन

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

◆★◆

बचतीच्या विविध योजना आपली शिल्लक
फायदेशीर रीत्या गुंतवतील.

खेळतें भांडवल : रु. बारा कोटींचे वर

व्याज—सेव्हिंग्ज खात्यावर द. सा. द. शें. दोन टक्के
स्पेशल सेव्हिंग्ज द. सा. द. शें. अडीच टक्के

विशाल महाराष्ट्रांत व इतरत्र ४४

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुख्य कचेरी
थोरले बाजीराव रस्ता,
पुणें २.

चिं. वि. जोग
मॅनेजर

**काथ्याचा सहकारी कारखाना**—केरळमधील अलेप्पी ह्या गांवीं कामगारांनीं काथ्याचा सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा कारखाना काढला आहे. काथ्याचा बंद पडलेला कारखाना चालविण्यास घेण्यासाठी सरकारनें आर्थिक मदत दिली आहे. त्याचप्रमाणें कारखान्यासाठीं लागणारें खेळतें भांडवलहि सरकारनें पुरविलें आहे.

**ब्राझीलमध्यें भीषण अवर्षण** ब्राझीलच्या ईशान्य भागांत अनावृष्टि झाल्यामुळें त्या भागांतील लोकांची अन्नान्नदशा झाली आहे. शेंकडों लोक कामधंदा शोधण्यासाठीं शहरांकडे धांव घेत आहेत. जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यांत अन्नपाण्याच्या अभावीं ४०० मुलें मृत्युमुखीं पडलीं. आतां पाऊस सुरू झाल्याच्या वार्ता आहेत. पाऊस पडल्यास शहरांकडे जाणाऱ्या लोकांचा लोंढा कमी होऊं लागेल.

**मदुरेच्या देवालयाला देणगी**—युगोस्लाव्हिआचे अध्यक्ष मार्शल टिटो ह्यांनीं मदुरा येथील सुप्रसिद्ध मीनाक्षीच्या देवालयाला भेट दिली. देवालयांतील अप्रतिम शिल्पाचें त्यांनीं कौतुक केलें देवालयाला भेट देऊन परत आल्यावर त्यांनीं देवालयाच्या व्यवस्थापकाला बोलावून घेऊन १,००० रुपयांची देणगी दिली.

**प्रवाशांसाठी अधिक सुखसोयी**—रेल्वेंतून तिसऱ्या वर्गानें प्रवास करणाऱ्या उतारूंसाठीं अधिक सुखसोयी उपलब्ध करून देण्याचा विचार रेल्वेबोर्डातर्फे करण्यांत येत आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत प्रवाशांच्या सोयींसाठी १५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आलेली आहे. रेल्वेंतून रोज सुमारें ३८ लाख लोक प्रवास करतात.

**विमान-वहातुकीचें एकीकरण**— एअर-इंडिआ इंटरनॅशनल व इंडिआ एअर लाइन्स ह्या दोन्ही कॉर्पोरेशन्सचे एक संयुक्त कॉर्पोरेशन् करण्याच्या प्रश्नाचा भारत सरकार विचार करीत आहे. ह्या प्रश्नाच्या कारभारविषयक व आर्थिक बाबींचा सध्या अभ्यास करण्यांत येत आहे. एकीकरण पूर्ण होण्यास सुमारें दोन वर्षांचा अवधी लागेल आणि त्यामुळें विमान-वाहतूक अधिक कार्यक्षम होईल असें सांगण्यांत येत आहे.

**सेसिल डिमिल ह्यांचें निधन**— आपल्या दिग्दर्शन कौशल्यानें सर्व जगभर प्रसिद्धि पावलेले अमेरिकन चित्रनिर्माते सेसिल डिमिल वयाच्या ७०-व्या वर्षी हृदयविकारानें निधन पावले. चित्रनिर्मितीच्या तंत्रांत त्यांनीं पुष्कळ नवनवीन सुधारणा केल्या. भव्य देखावे घेण्यांत त्यांचा हातखंडा होता चित्रपटांप्रमाणेंच विमानविद्या, राजकारण, खोल समुद्रांतील मच्छीमारी, इत्यादि विषयांविषयीं त्यांना आस्था होती.

**लँकेशायरची कापडाची निर्यात**—ब्रिटनच्या बोर्ड ऑफ ट्रेडनें जाहीर केलेल्या आंकड्यांप्रमाणें गेल्या वर्षी लँकेशायरमधील कापडाच्या गिरण्यांनीं निर्यात केलेल्या कापडापेक्षा अधिक कापडाची आयात करण्यांत आली. दोन शतकांत अशा प्रकारचा हा पहिलाच प्रसंग असून त्याबद्दल गिरणीमालकांच्या संघाच्या संचालकानें दुःख व्यक्त केलें आहे.

**शास्त्रज्ञांच्या भेटीचा करार**—रशिआ व अमेरिका ह्या देशांतील शास्त्रज्ञांनीं एकमेकांच्या देशांना भेटी देऊन संशोधनाबाबत सहकार्य करावें, अशा स्वरूपाचा करार उभयता देशांत होण्याचा संभव आहे. सोव्हिएट उपपंतप्रधान मि. मिकोयान ह्यांच्या अमेरिकेच्या भेटींतून हा प्रश्न निघाला असावा.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :-१० बुधवार पेठ, पुणें २ प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ ) | अध्यक्ष श्री. ग. रा. साठे | मुंबई शाखा :-८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल ... ... | रु. ७,३०,४९० |
| खेळतें भांडवल ... ... | रु.५८,००,००० |

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १३/४% टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.